डॉ. दिपक म्हैसेकर, भा.प्र.से.
विभागीय आयुक्त, पुणे विभाग,
पुणे.

अ.शा.पत्र क्र.:पीए/पीईमार/२६६/२०२०.
विभागीय आयुक्त कार्यालय,
विधानभवन, पुणे-४११००१.
दूरध्वनी क्र: (का) ०२०-२६३६२२२३
ईमेल :divcom.pune@maharashtra.gov.in
दिनांक : 02/05/2020.

विषय- स्थलांतरीत कामगार / व्यक्तींबाबत मार्गदर्शक सूचना.

संदर्भ- 1. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि. 30/04/2020.

2. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु2020/सीआर. 92/डीआयएसएम-1 दि. 1 मे, 2020.

3. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु2020/सीआर.92/डीआयएमएम-1 दि. 1 मे, 2020.

उपरोक्त अधिसूचनेप्रमाणे विविध राज्यात / जिल्हयात अडकलेले विस्थापित कामगार / पर्यटक / विद्यार्थी / भाविक व इतर व्यक्तींना जिल्हयात येण्यासाठी किंवा जिल्हयातून बाहेर जाण्यासाठी त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांना प्राधिकृत केलेले आहे.

परराज्यात जाणारे व्यक्ती या एक प्रकारात मोडतील.

इतर जिल्हयातून किंवा राज्यातून येणाऱ्या व्यक्ती या दुसऱ्या प्रकारात मोडतील.

1) शासनाच्या अधिसूचनेप्रमाणे ज्या जिल्हयामध्ये पोलीस आयुक्तालय आहेत तेथे ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या समूहाला त्यांच्या मूळ गावी जायचे आहे त्यांची माहिती हया व्यक्ती सध्या जेथे राहतात तेथील पोलीस उपायुक्त एकत्रित करेल.

2) या माहितीमध्ये आधार क्रमांक / दूरध्वनी क्रमांक व पत्ता, तसेच ज्या ठिकाणी जावयाचे आहे ते स्थळ व ज्या वाहनाने जावयाचे आहे म्हणजे (कार, बस इ.) याचा स्पष्ट उल्लेख असावा.

3) गटाच्या बाबतीत हि माहिती एकत्र करुन गट प्रमूख अर्ज करु शकेल.

Scanned with CamScanner

4) वैद्यकिय अधिकार-याचे शीतज्वर (एन्फलूएन्झा) सारखी लक्षण नाहीत असे प्रमाणपत्र व्यक्तीनिहाय असणे आवश्यक आहे. / गटाच्या बाबतीत सोबत दर्शविलेल्या प्रपत्राप्रमाणे प्रमाणपत्र दयावे.

5) पोलीस उपायुक्त त्यांच्या परिक्षेत्रासाठी शिर्ष अधिकारी (Nodal Officer) म्हणून काम पाहतील.

6) ई-पास सिस्टीम सध्या पोलीस वापरत आहेत तीच वापरली जाईल. http://covid19.mhpolice.in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल.

7) शिर्ष अधिकारी (म्हणजे जिल्हाधिकारी) हे ज्या परराज्यातील / जिल्हयातीत व्यक्ती त्यांच्या जिल्हयात अडकलेल्या आहेत त्याची यादी तयार करतील व ही यादी राज्यनिहाय व शक्यतो जिल्हानिहाय करण्यात यावी.

8) ज्या जिल्हयात / राज्यात व्यक्तींना जावयाचे आहे तेथील शिर्ष अधिकारी यांचेशी समन्वय साधून त्यांना पाठविण्यात यावे.

9) तसेच ज्या राज्यात / जिल्हयात ते जाणार आहेत त्या राज्याने / जिल्हयाने त्यांच्या स्वीकृतीची व्यवस्था केली आहे याची खात्री करावी. तसेच त्या आशयाचे पत्र त्या राज्याकडून / जिल्हयाकडून प्राप्त करून घ्यावे.

10) ज्या व्यक्ती स्वत:ची वाहतूक व्यवस्था करून जाऊ इच्छितात त्यांच्या बाबतीत पाठविणा-या जिल्हयाने समन्वय साधून त्यांना जाण्यासाठी परवानगी दयावी.

11) ज्या वाहनांनी ते जाणार आहेत त्या वाहनांवर लावण्यासाठी ट्रान्जीट पास / वाहन परवाना तयार करण्यात यावा व याच ट्रान्जीट पासवर ते कोणत्या मार्गाने जाणार आहेत व त्या वाहनांमध्ये किती व्यक्ती प्रवास करणार आहेत याचा स्पष्ट उल्लेख असावा.

12) पोहचण्याचे अंतिम ठिकाण निहाय राज्य / केंद्रशाषित प्रदेश जिल्हानिहाय यादी तयार करण्यात यावी व ती त्या प्राधिका-यांना पाठविण्यात यावी.

13) वाहतूकीसाठी वापरण्यात येणा-या वाहनांचे वापरापूर्वी व वापरानंतर निर्जंतूकीकरण करुन घेण्यात यावे.

14) संबंधित तहसिलदार हे तहसिल स्तरावर अशा लोकांची यादी तयार करतील.

15) या यादीनुसार एका ठिकाणी गटाने लोक असल्यास त्यांची वैदयकीय तपासणी करुन त्याचे प्रमाणपत्र घेतले जाईल. यादी करताना राज्य / जिल्हा / तालुकानिहाय अशा पध्दतीने करावी.

Scanned with CamScanner

16) जिल्हास्तरावर या बाबतीत एक संपर्क अधिकारी नेमण्यात यावा.

17) या व्यक्ती ज्या राज्यात किंवा ज्या ठिकाणी जाणार आहेत त्यांचा मार्ग योजना आराखडा (route plan) तयार करुन घेण्यात यावा. त्यानंतर त्यांच्या जिल्हाधिका-यांनी मान्यता दयावी.

18) प्रत्येक वाहनांसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे असावीत.

अ) वाहन परवाना, ब) प्रवाशांची यादी, क) प्रत्येक प्रवाशाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, गट समुहाचे नाव उल्लेखासह प्रमाणपत्र ड) प्रत्येक प्रवाशांचे बंधपत्र. सोबत बंधपत्र, वैद्यकीय प्रमाणपत्र, वाहन प्रमाणपत्राचा नमूना जोडण्यात येत आहे.

19)शक्यतो या प्रवासा दरम्यान प्रवाशांनी कमीत कमी ठिकाणी थांबणे अपेक्षित राहिल व अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत मुक्काम करावयाचा असल्यास त्याची पूर्व कल्पना मार्ग योजना आराखडया मध्ये (Route Plan) देण्यात यावी.

**राज्याअंतर्गत, आंतरजिल्हा बर्हीगमन करणाऱ्या व्यक्तींबाबत सूचना.**

1) जिल्हाधिकारी आणि आयुक्त, महानगरपालिका यांनी ठरविलेल्या प्रतिबंधित क्षेत्रात (Containment Zone) येणे तसेच बाहेर जाण्यास परवानगी दिली जाणार नाही.

2) मुंबई महानगर क्षेत्र / पुणे महानगरपालिका / पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातून इतर जिल्हयात जाण्याच्या परवानगी बाबतीत अत्यंत काळजीपूर्वक निर्णय घेण्यात यावा व महानगरपालिका आयुक्तांनी प्रतिबंधित क्षेत्राच्या सीमा निश्चित केल्याशिवाय वाहतूक सुरु करण्यात येवू नये.

3) मालेगाव, सोलापूर, अकोला, अमरावती, यवतमाळ, औरंगाबाद, नागपूर व इतर प्रतिबंधित क्षेत्रातून व्यक्तींना परवानगी देतांना अतिशय काळजी घेण्यात यावी.

4) ज्या व्यक्तीला परवानगी देण्यात येत आहे त्या व्यक्तीला शीतज्वर (एन्फलूएंझा) सारखे लक्षण नाही असे नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायीक यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

5) जिल्हयाचे शीर्ष अधिकारी हे ज्या जिल्हयात प्रवासी जाणार आहेत त्या जिल्हयातील शीर्ष अधिकाऱ्यांना कळवतील व त्या शीर्ष अधिकाऱ्याने परवानगी दिल्यानंतरच प्रवाशी वाहतूक सुरु होईल.

Scanned with CamScanner

# जिल्हयात येणाऱ्या व्यक्तींबाबत सूचना.

1) इतर जिल्हयातून अशा प्रकारचे प्रवाशी आपल्या जिल्हयात येण्याची परवानगी मिळण्यासाठी आलेले पत्र व्यवहारावर किंवा विनंती वर कक्षामध्ये वेगळया कर्मचाऱ्यांमार्फत ही परवानगी देण्याची जबाबदारी देण्यात यावी.

2) इतर जिल्हयातून किंवा राज्यातून येणाऱ्यांना 14 दिवसांसाठी गृह विलगीकरण किंवा तपासणी अंती संस्थांत्मक विलगीकरणामध्ये ठेवण्यात येईल याची पूर्व कल्पना दयावी.

3) बाहेरची वाहने शहराच्या चेक पोस्टमध्ये आल्यानंतर त्या वाहनांचे बाहयनिर्जंतूकीकरण व गंतव्यस्थानी पोहोचल्यानंतर अंतर्गत निर्जंतूकीकरण अत्यावश्यक राहील.

4) येणाऱ्या व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करुन त्या व्यक्तींना आवश्यकते प्रमाणे गृह विलगीकरण किंवा संस्थात्मक विलगीकरणाचा सल्ला दिला जाईल.

5) जिल्हयात प्रवेशाच्या ठिकाणी पोलीस, महसूल व वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत थर्मल गन व इतर अनुषंगिक तपासणी करुन, गृह विलगीकरण / संस्थात्मक विलगीकरणाचा शिक्का मारावा तसे स्पष्ट निर्देश देवून अशा व्यक्तींना गृह विलगीकरणाचे छापील पत्रके देण्यात यावे व त्यांनी गृह विलगीकरणाचे उल्लंघन केल्यास उल्लंघनाच्या दिवसापासून पुढे 14 दिवस त्यांचे संस्थात्मक विलगीकरण केले जाईल याची त्यांना जाणीव करुन दयावी.

6) परराज्यातून जिल्हयात येणाऱ्या रहिवाशांच्या बाबतीत त्या राज्यातून शीर्ष अधिकारी / जिल्हाधिकारी यांच्याकडून यादी जोडपत्र 'ब' प्रमाणे परवानगी, वैद्यकीय प्रमाणपत्र, मार्गक्रमण योजना आराखडा (Route Plan), वाहनाची परवानगी, प्रवासाचा कालावधी व त्या वाहनात अनुज्ञेय असलेलेच व्यक्ती त्या वाहनात असल्याची खात्री करावी.

7) अनुज्ञेय नसलेल्या व्यक्ती असल्यास पूर्ण वाहनांची वेगळयाने छाननी तपासणी करुन त्या व्यक्ती विलग करण्यात याव्यात.

8) जिल्हा अंतर्गत इतर राज्यातून येणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत त्या राज्याने किंवा राज्यातील प्राधिकाऱ्यांनी ज्या जिल्हयात ते पोहोचणार आहेत त्याबाबत पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

9) इतर राज्यातील व्यक्तींनी येतांना प्रतिबंधित क्षेत्र (Containment zone) व रेड झोन मधील जिल्हयामध्ये मुक्काम करु नये ही अट घालण्यात यावी. सोबत यादी जोडत आहे.

10) जाणाऱ्या, येणाऱ्या, राज्याअंतर्गत, राज्याबाहेरील या सर्वांनी त्यांच्या मोबाईलमध्ये आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड करुन घेणे बंधनकारक राहील.

आपला

(डॉ. दिपक म्हैसेकर)

प्रति,

जिल्हाधिकारी,
पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर.

Scanned with CamScanner

# Office of The Collector & DM

| | |
|---|---|
| Web | Email |
| Landline | Fax No. |
| Branch | No. |

Contact No. Date-

(Control Room)

(24/7 operational)

Ref:- 1. Ministry of Home Affairs (MHA) order No. 40-3/2020-Dm-I(A) Dated 19 April 2020

2. Hon. Chief Secretary, Government of Maharashtra Order No. DMU/2020/CR.92/ DisM-1, Dated: 30th April 2020

# VEHICLE PASS

Vehicle No. / TYPE :- ------------------------------------------------------------

Driver Name :- ------------------------------------------------------------

Mob. No. :- ------------------------------------------------------------

Valid From :- ------------------------------------------------------------

Valid Upto :- ------------------------------------------------------------

Route With Halts (if any) :- ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

No. of Persons in Vehicle :-

Round Seal

Incident Commander

Tahsil ----------------------

District-

State- Maharashtra

Scanned with CamScanner

# Bond

Date :-

I, Mr./Mrs./Smt. ------------------------------------------------------------------
Age --------- years is a resident of ---------------------------------------------
Village -----------------Taluka/Tahsil ---------------------- District. I wish to go to above place. I agree that, after entering the district, I will abide by the standard health protocol by the receiving district/state. After health checkup/screening for COVID-19 by qualified medical team, I will follow the instructions regarding home quarantine/Institutional quarantine.

I understand if I violate any of the order I am liable for punishment under Disaster Management Act, 2005 & Indian Penal Code, Section 188.

Signature

Name

Mobile Number

Scanned with CamScanner

# बंधपत्र (Bond)

तारीखः-

मै, श्री/श्रीमती ------------------------------------------ उम्र---------- वर्ष---- ------------ तालुका/तहसिल--------------- जिल्हा-------------- का निवासी हूं। मै अपने जिले मे वापीस जाना चाहता हूं/चाहती हूं। मै बंधपत्र देता हूं की, अपने जिले मे प्रवेश करते समय मेरी वैदयकीय चिकीत्सा/ जांच करने के बाद चिकीत्सा अधिकारी के राय नुसार Home Quarantine/Institutional Quarantine मे रहुंगा/रहूंगी अन्यथा आपदा प्रबंधन अधिनियम २००५ के अनुसार भारतीय दंड संहिता धारा (section) १८८ अनुसार होनेवाले शिक्षा को मै पात्र रहूंगा/रहूंगी।

**दस्तखत (Signature)**
**(दस्तखतकर्ता का नाम)**

Scanned with CamScanner